MHNS180010022020

दाखल दि. : २२/१०/२०२०
नोंदणी दि. : २२/१०/२०२०
निकाल दि.: ०५/०५/२०२६
कालावधी : वर्ष महिना दिवस
०५ ०६ १५

**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कळवण जिल्हा नाशिक यांच्या न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारी एम.व्ही. जावळे)

**सं.फौ.ख. क्र. ६०४/२०२०** **नि क्र.७४**

प्रथम खबर क्र.३२/२०२०, पोलीस ठाणे अभोणा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलिस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे अभोणा<br>ता. कळवण, जि.नाशिक. |
| सहा. सरकारी अभियोक्ता | श्री. एस.जे. बडे. |
| आरोपी | **०१. विश्वनाथ हिराजी भोये**<br>वय : ४५ वर्ष, धंदा : शेती,<br>**०२. राधाबाई विश्वनाथ भोये**<br>वय : ४० वर्ष, धंदा : शेती,<br>**०४. पुनम विश्वनाथ भोये**<br>वय : २४ वर्ष, धंदा : व्यापार<br>**०५. मोनीका विश्वनाथ भोये**<br>वय : २१ वर्ष, धंदा : शिक्षण<br>रा. दळवट, ता.कळवण,जि.नाशिक. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | श्री. के.बी.वाघ. |

| | |
|---|---|
| घटना तारीख | ०१/०७/२०२० |
| प्रथम खबर तारीख | ०१/०७/२०२० |
| दोषारोप दाखल तारीख | २२/०९/२०२० |
| आरोपींविरुध्द दोषारोप निश्चित तारीख | ०४/१०/२०२१ |
| पुरावा चालु तारीख | २१/०७/२०२२ |
| न्यायनिवाडा राखुन ठेवलेली तारीख | नाही |
| न्यायनिवाडा तारीख | ०५/०५/२०२६ |

## आरोपींची सविस्तर माहिती

| अ. क्र. | आरोपींचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अतिंम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्या बाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | विश्वनाथ हिराजी भोये | नाही | ०४.१०.२०२१ | भादवि कलम १४७, ४४७, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ व मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह कलम १३५ अन्वये निर्दोष मुक्त निर्दोष मुक्त | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ०२. | राधाबाई विश्वनाथ भोये | नाही | ०४.१०.२०२१ | | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ०४. | पुनम विश्वनाथ भोये | नाही | ०४.१०.२०२१ | | निरंक | निरंक | निर्दोष मुक्त |
| ०५. | मोनीका विश्वनाथ भोये | नाही | ०४.१०.२०२१ | | निरंक | निरंक | निर्दोष मुक्त |

## अ– अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी –

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| सा.क्र. ०१ | योगिता सुरेश चव्हाण | फिर्यादी |

| | | |
|---|---|---|
| सा.क्र. ०२ | राजेंद्र प्रमोद पवार | घटनास्थळ पंच |
| सा.क्र. ०३ | सुरेश रामचंद्र चव्हाण | साक्षीदार |
| सा.क्र. ०४ | किसन धोंडीराम काळे | पंच साक्षीदार |

**अ– <u>आरोपीतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी</u> –**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

**अ– <u>न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी</u> –**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

अभियोगपक्षातर्फे, आरोपीतर्फे व न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले कागदपत्र

**अ. <u>अभियोगपक्षातर्फे</u> –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी क्र.३७ | फिर्याद |
| २ | निशाणी क्र.३९ | पंचनामा |

**<u>आरोपीतर्फे</u>**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

**न्यायालयातर्फे –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

**मुद्येमाल –**

| अ.क्र. | आर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

**न्यायनिर्णय**

(दिनांक ०५/०५/२०२६ रोजी घोषीत)

आरोपीं विरुध्द प्रस्तुत खटला भारतीय दंड विधान, १८६० कलम १४७, ४४७, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ आणि मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)(३) अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढील प्रमाणेः–**

**०२.** फिर्यादी सौ. योगिता सुरेश चव्हाण हीने पोलीस ठाणे अभोणा येथे फिर्याद दिली की, दि.०१.०७.२०२० रोजी ती व तीच्या चार बहिणी यांच्या नावावर असलेल्या शेत गट क्र.१३१ मध्ये गेली असता सदर गटामध्ये आरोपी विश्वनाथने तक्रारदार व तीच्या बहिणींना न विचारता सोयाबीन पिक घेतलेले होते. त्यामुळे सदर दिवशी दुपारी ०४.०० वाजताचे सुमारास फिर्यादी व तीची बहिण सुनिता असे सदर गटामध्ये जमीन नांगरण्यासाठी ट्रॅक्टर घेवून गेले होते. त्यावेळी फिर्यादी व तीची बहिण सुनिता यांनी आरोपी विश्वनाथला विचारले की, तु आमच्या शेतजमीनीमध्ये पिक कसे काय घेतले. यावर आरोपी त्यांना म्हणाला की, मी या शेतीचा मालक आहे, तुमचा काहीएक संबंध नाही व त्याने फिर्यादी व तीची बहिण यांना आडकाठी

केली व सदर शेतजमीन नांगरु दिली नाही. आरोपीने फिर्यादी व तीच्या बहिणीला शिवीगाळ केली. त्यावेळी इतर आरोपी तेथे आले व त्यांनीही फिर्यादी व तीच्या बहिणीला शिवीगाळ व हाताचापटीने मारहाण केली. आरोपींनी सदर इसमांना, तुम्ही जर शेत गट क्र.१३१ मध्ये ट्रॅक्टर नांगरणीसाठी चालविला, तर आम्ही तुम्हा दोघी बहिणींचा शेतातच मुडदा गाडून टाकू असा दम दिला. तसेच आरोपी सदर इसमांना म्हणाले की, तुम्हा बहिणींकडे असलेला शेतगट क्र.१३१ चा सातबारा उतारा खोटा असुन माझाकडे असलेला सातबारा उतारा खरा आहे, सदरचा उतारा तुम्ही खोटा बनवून आणाला आहे.

**०३.** सदर फिर्यादवरुन आरोपीं विरुध्द पोलीस ठाणे, अभोणा येथे गुन्हा क्रमांक ३६/२०२० नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान तपासी अंमलदार यांनी घटनास्थळ पंचनामा केला, सदर प्रकरणात साक्षीदारांचे जबाब नोंदविले व वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपींना अटक केली व तपासाअंती आरोपीं विरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

**०४.** माझ्या पुर्वाधिकारी यांनी आरोपीं विरुध्द निशाणी क्रमांक २८ वर भारतीय दंड विधान, १८६० कलम १४७, ४४७, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ आणि मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)(३) अनवये दोषारोप ठेवले. सदर दोषारोप आरोपींस समजावुन सांगण्यात आले. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे नमुद करुन संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

**०५.** आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने योगिता सुरेश चव्हाण सा.क्र.०१ नि.क्र.३६, राजेंद्र प्रमोद पवार सा.क्र.०२ नि.क्र.३८, सुरेश रामचंद्र चव्हाण नि.क्र.५२ व तपासाधिकारी किसन धोंडीराम काळे नि.क्र.५८ यांची साक्ष नोंदविली आहे.

**०६.** अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. के.बी.वाघ यांचा युक्तीवाद ऐकला.

**०७.** खालील मुद्दे परामर्श करण्याकरीता माझे समक्ष उपस्थित होतात. त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दि.०१.०७.२०२० रोजी, दुपारी ०४.०० वाजता, दळवट, ता.कळवण, जि.नाशिक येथे आरोपींनी विधी संघर्षीत बाल गुन्हेगार रॉयल भोये याच्यासह फिर्यादीला धमकी देण्याच्या समान उद्येशाने बेकायदेशीर जमाव केला? | नाही. |
| ०२. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी विधी संघर्षीत बाल गुन्हेगार रॉयल भोये याच्यासह फिर्यादीला धमकी देण्याच्या समान उद्येशाने, फिर्यादीच्या शेतात अनाधिकृतपणे प्रवेश केला ? | नाही. |
| ०३. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी बाल गुन्हेगार रॉयल भोये याच्यासह त्यांच्या वरील समान उद्येशाने बेकायदेशीर जमाव केला व तक्रारदार आणि साक्षीदाराला लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली? | नाही. |
| ०४. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी बाल गुन्हेगार रॉयल | |

| | | |
|---|---|---|
| | भोये याच्यासह आरोपींनी त्यांच्या वरील समान उद्येशाने बेकायदेशीर जमाव केला व फिर्यादी आणि साक्षीदाराकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने त्यांचा अपमान केला? | नाही. |
| ०५. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी बाल गुन्हेगार रॉयल भोये याच्यासह त्यांच्या वरील समान उद्येशाने बेकायदेशीर जमाव केला व तक्रारदार आणि साक्षीदार यांना फौजदारी पात्र धाकदपटशा केला? | नाही. |
| ०६. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी बाल गुन्हेगार रॉयल भोये याच्यासह जिल्हाधिकारी, नाशिक यांचा जमावबंदीचा प्रतिबंधात्मक आदेश अस्तित्वात असतांना, आरोपींनी सदर आदेशाचा भंग केला ? | नाही. |
| ०७. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र. ०१ ते ०६ करीता :-

**०८.** सदर मुद्दे एकसारख्या पुराव्यावर आधारीत असल्यामुळे पुराव्याची पुनरावृती टाळण्याकरीता त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहे. आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने विनासंशय असे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपींनी विधी संघर्षीत बालक रॉयल भोये याच्यासह बेकायदेशीरपणे

जमाव करुन फिर्यादीच्या शेतात अनाधिकृतपणे प्रवेश केला, फिर्यादी व साक्षीदाराला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व ईच्छापुर्वक दुखापत पोहोचविली, त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने त्यांचा हेतुपूर्वक अपमान केला, त्यांना फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग केला. सदर बाबी सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने नमूद साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे.

**०९.** योगिता चव्हाण फिर्यादी सा.क्र ०१ हीने पुराव्या दरम्यान असे कथन केले की, तीच्या वडिलांचे नांव हिराजी काळु भोये असे होते. ते सध्या हयात नाहीत. घटना सन २०२० मध्ये घडली होती. तीच्या वडिलांनी शेतजमीन गट क्र. १३१ हे तीला व तीच्या तीन बहिणींना दिले होते. ते गट क्र.१३१ मध्ये ट्रॅक्टर घेउन काम करण्यासाठी गेले असता तीचा भाउ विश्वनाथ भोये याने त्यांचा ट्रॅक्टर अडविला. त्याने फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ केली होती. त्याने तीला व तीच्या बहिणींना हाताचापटीने मारहाण केली होती. तो त्यांना म्हणाला की, हे शेत माझे आहे, तुमच्याजवळचे उतारे खोटे आहेत. त्यानंतर तीने अभोणा पोलीस ठाण्यात फिर्याद नि.क्र.३७ दिली.

**१०.** फिर्यादीने उलटतपासात नमुद केले की, ती व तीच्या बहिणींनी विश्वनाथ विरुध्द सन २०१९ मध्ये वाटपाबाबत दावा दाखल केला आहे. गट क्र.१३१ ही वडिलोपार्जीत मिळकत असुन त्यामध्ये विश्वनाथला स्वतंत्र क्षेत्रफळ दिलेले नाही. गट क्र.१३१ च्या शेजारी तीचे चुलते दौलत काळु भोये राहतात. ते गट क्र.१३१ पासुन ०३ कि.मी. अंतरावर राहतात. अरुण व राजेंद्र तीचे नातेवाईक असुन सुरेश तीचे पती आहेत, सुनिल तीचा मुलगा व बबली मुलगी आहे. तसेच, सुनिता

तीची बहिण असुन आबा दौलत चुलतभाउ आहे. गट क्र.१३१ हा मुख्य रस्त्यावर असुन तेथे नेहमी वर्दळ असते. गट क्र.१३१ च्या शेजारी असलेल्या जमीनधारकाचे इसम तेथे राहतात.

**११.** फिर्यादीची साक्ष पाहीली असता, तीने प्रस्तुत घटनेबाबत तीच्या साक्षीमध्ये नमुद केले आहे. परंतु, असे असले तरी तीने उलटतपासात ती व तीच्या बहिणींनी आरोपी विश्वनाथ विरुध्द सन २०१९ मध्ये वाटपाबाबत दावा दाखल केला असल्याचे नमुद केले आहे. फिर्यादीच्या साक्षीला सुरेश सा.क्र.०३ यांनी दुजोरा देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, त्यांनी सुध्दा उलटतपासात फिर्यादी व तीचा भाऊ यांच्यामध्ये जमिनीच्या कारणावरुन वाद असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे, आरोपी व फिर्यादी, साक्षीदारांमध्ये शेतजमीनीच्या कारणावरुन वाद असल्याचे व पुर्ववैमनस्य असल्याचे स्पष्ट होते. पुर्व वैमनस्य हे दुधारी तलवारीसारखे असते. त्यामुळे, प्रस्तुत फिर्याद सुध्दा यातुनच दिल्याची शक्यता नाकारता येत नाही. महत्वाची बाब म्हणजे सा.क्र.०३ हे फिर्यादीचे पती असुन प्रस्तुत प्रकरणातील स्वारस्य साक्षीदार आहेत. फिर्यादीच्या साक्षीला दुजोरा देण्याकरीता सा.क्र०३ व्यतिरिक्त इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. फिर्यादीने तीच्या साक्षीमध्ये आरोपी विश्वनाथने त्यांचा ट्रॅक्टर अडविला, शिवीगाळ केली व तीला आणि तीच्या बहिणींना हाताचापटीने मारहाण केल्याचे नमुद केले आहे. परंतु, सा.क्र.०३ हा घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुनही त्याने साक्षीमध्ये याबाबत काहीही नमुद केलेले नाही. त्यामुळे, सा.क्र.०३ हा घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुनही फिर्यादीच्या पुराव्याला दुजोरा दिलेला नाही. एकंदरीत फिर्यादीच्या साक्षीतुन फिर्याद शाबीत झाली असली, तरी तीचा पुरावा हा आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत होण्या इतपत पुरेसा नाही.

**१२.** सुरेश चव्हाण सा.क्र.०३ हा फिर्यादीचा पती असुन घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. त्याने साक्षीमध्ये नमुद केले की, घटना अंदाजे ०३ वर्षांपुर्वी दळवट येथे त्यांच्या शेतामध्ये सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास घडली होती. त्यावेळी तो, त्याचा भाउ व पत्नी शेतात हजर होते. त्यांनी त्याच्या पत्नीच्या भावाचे त्यांच्या सोबत जमीनीच्या कारणावरुन भांडण झाले. ते सदर शेताची ट्रॅक्टरने नांगरणी करणार होते. भांडण झाल्यामुळे ते नांगरणी न करता पळुन आले.

**१३.** साक्षीदाराने उलटतपासात नमुद केले की, फिर्यादी त्याची पत्नी आहे. त्याची पत्नी व तीचा भाउ यांचा जमीनीच्या वाटपावरुन वाद आहे. त्याची पत्नी व तीच्या बहिणीने आरोपीविरुध्द वाटपाचा दावा दाखल केला आहे. घटनेच्या वेळी तो मळगांव येथे होता किंवा कसे त्याला आठवत नाही.

**१४.** साक्षीदाराची साक्ष पाहीली असता तो फिर्यादीचा पती असुन प्रस्तुत प्रकरणातील स्वारस्य साक्षीदार आहे. साक्षीदाराने साक्षीमध्ये आरोपी विश्वनाथने फिर्यादी व त्याला शिवीगाळ करुन मारहाण केल्याबाबत कोठेही नमुद करत नाही. त्याची साक्ष अत्यंत मोघम स्वरुपाची असुन फिर्यादीच्या पुराव्याशी अतिशय विसंगत आहे. त्यामुळे, साक्षीदाराचा पुरावा अभियोगपक्षास उपयुक्त नाही.

**१५.** राजेंद्र पवार सा.क्र.०२ हा पंच असुन त्याने साक्षीमध्ये नमुद केले आहे की, दि.०२.०७.२०२० रोजी स.१०.०० वा. पोलिसांनी त्याला दळवट गांवी फिर्यादीच्या गोडावुनजवळ गट क्र.१३१ मध्ये घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. घटनास्थळ योगीता चव्हाण यांनी दाखविले होते. त्यावेळी शेतात सोयाबीन पेरलेले होते व नांगरटी केली होती. घटनास्थळी पुर्वेला धर्मा पवार यांचे शेत आहे, पश्चिमेला गांगुर्डे यांचे शेत आहे, दक्षिणेला नामदेव पवार यांचे शेत आहे व

उत्तरलेला गोडावुन आहे. पोलीसांनी त्यांना तेथे पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते. पंचनामा नि.क्र.३९ वर त्याची सही असुन मजकूर बरोबर आहे. सदर ठिकाणी आरोपी व तक्रारदार यांचे भांडण झाले होते.

**१६.** साक्षीदाराने उलटतपासात नमुद केले आहे की, त्यांना योगीता चव्हाण व तीचे पती यांनी न्यायालयात आणले आहे. गट क्र.१३१ मध्ये कोणाचे क्षेत्र आहे हे ते निश्चितपणे सांगु शकत नाही.

**१७.** प्रस्तुत पंच साक्षीदाराची साक्ष पाहीली असता, त्याच्या साक्षीतुन पंचनामा शाबीत झाला असला तरी त्याने उलटतपासात फिर्यादी व सा.क्र.०२ यांच्या सांगण्यावरुन तो न्यायालयात आला असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे, सदर पंच साक्षीदार हा फिर्यादी व सा.क्र.०२ यांच्या सांगण्यावरुन साक्ष देत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. वर नमुद केल्याप्रमाणे फिर्यादी व सा.क्र.०२ यांचा पुरावा अभियोगपक्षास उपयुक्त ठरलेला नाही. त्यामुळे, प्रस्तुत पंच साक्षीदाराच्या साक्षीतुन पंचनामा शाबीत झाला असला, तरी तो आरोपींविरुध्दचा गुन्हा शाबीत होण्यास उपयुक्त ठरत नाही.

**१८.** किसन काळे सा.क्र.०४ हे तपासाधिकारी असुन त्यांनी साक्षीमध्ये नमुद केले आहे की, घटना दि.०१/०७/२०२० रोजी १६.०० वाजता घडली होती. ते त्यावेळी पो. ठाणे अभोणा येथे पो.ह. म्हणुन कार्यरत असतांना त्यांनी गुन्हा क्र.३६/२०२० नोंद होवून त्याचा तपास त्यांनी केला होता. तपासा दरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. साक्षीदारांचे त्यांचे सांगण्याप्रमाणे जबाब नोंदविले. वादातील जमीनीचा ७/१२ उतारा हस्तगत केला. तपासाअंती आरोपी विरुध्द पुरावा मिळून आल्याने दोषारोप पत्र दाखल केले.

१९. साक्षीदाराने उलटतपासात नमुद केले आहे की, वादग्रस्त जमीनीचा ७/१२ त्यांनी पाहिला होता. त्यावर आरोपी विश्वनाथ यांचे पण नाव आहे. आरोपी हा रोडच्या बाजूला राहतो. ती जागा वादग्रस्त मिळकतीचा भाग आहे किंवा कसे हे त्यांना माहित नाही. सदर मिळकतीला फिर्यादी व्यतीरिक्त इतर लोकांचे देखील नावे आहेत. त्यांनी त्या सर्वांचे जबाब नोंदविले नाहीत. त्यांनी फिर्यादीच्या नातेवाईकाचे जबाब नोंदविले आहेत.

२०. तपासाधिकारी यांचा पुरावा पाहीला असता त्यांनी तपासादरम्यान केलेल्या बाबींचा उल्लेख केला आहे. महत्वाची बाब म्हणजे उलटतपासात त्यांनी फिर्यादीच्या नातेवाईकां व्यतिरिक्त इतर कोणाचेही जबाब नोंदविले नसल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे, त्यांचा पुरावा हा फिर्यादीच्या पुराव्याशी विसंगत असुन तपासापुरता मर्यादीत स्वरुपाचा असल्याने अभियोगपक्षास उपयुक्त नाही.

२१. पटलावरील एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता फिर्यादी व सा.क्र.०३ यांची साक्ष एकमेकांशी विसंगत आहे. फिर्यादीच्या साक्षीला स्वतंत्र साक्षीदाराच्या पुराव्याची जोड मिळालेली नाही. सा.क्र.०३ हा स्वारस्य साक्षीदार असुन त्याचा पुरावा अत्यंत मोघम स्वरुपाचा आहे. पंच सा.क्र.०२ याच्या पुराव्यातुन केवळ पंचनामा शाबीत झाला असला तरी आरोपीविरुध्दचा गुन्हा शाबीत होण्यास त्याची साक्ष पुरेशी नाही. तपासाधिकारी सा.क्र.०४ किसन काळे यांची साक्ष तपासादरम्यान केलेल्या बाबींपुरतीच मर्यादीत स्वरुपाची आहे. एकंदरीत उपलब्ध पुराव्या वरुन आरोपींनी विधी संघर्षीत बालक रॉयल भोये याच्यासह बेकायदेशीरपणे जमाव करुन फिर्यादीच्या शेतात अनाधिकृतपणे प्रवेश केला, फिर्यादी व साक्षीदाराला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व ईच्छापुर्वक दुखापत पोहोचविली, त्यांना शिवीगाळ करुन त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने त्यांचा हेतुपूर्वक

अपमान केला, त्यांना फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग केला हे तथ्य संशयाचे पलिकडे जावुन सिध्द होत नाहीत. सबब, मी मुद्दा क्रमांक ०१ ते ०६ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**मुद्दे क्र.०७ करीता** :–

**२२.** मुद्दा क्रमांक ०१ ते ०६ च्या निष्कर्षावरुन अभियोग पक्ष आरोपीवरील दोषारोप सिध्द करु शकला नसल्याने आरोपींची निर्दोष मुक्तता करणे न्यायसंगत वाटते. सबब, मी मुद्दा क्रमांक ०७ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. आरोपी **०१. विश्वनाथ हिराजी भोये ०२. राधाबाई विश्वनाथ भोये ०४. पुनम विश्वनाथ भोये ०५. मोनीका विश्वनाथ भोये** यांची भारतीय दंड विधान, १८६० कलम १४७, ४४७, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ आणि मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह कलम १३५ या कलमांखालील गुन्ह्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया सहिंता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचा जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३. आरोपींनी फौ.प्र.संहीता कलम ४३७–अ ची पुर्तता केली आहे.

४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.

MEGHARAJ VAMANRAO JAWALE

Digitally signed by MEGHARAJ VAMANRAO JAWALE
Date: 2026.05.05 12:42:09 +0530

**(एम.व्ही. जावळे)**

दि. ०५/०५/२०२६

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,

कळवण.